# PROFIT ADVERTISERS (INDIA) Pvt. Ltd.

| | PRESS CLIPPING | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Client | Agrovision (1st Day) | | | | |
| Publication | Punyanagari | | | | |
| Language | Marathi | Place | Nagpur | Date | 12/11/16 |

# कृषी विद्यापीठांनी संशोधनातून शेतकऱ्यांना मदत करावी

**नितीन गडकरी यांचे आवाहन** ॲग्रोव्हिजनचे कायम कार्यालय उघडणार; शेतकऱ्यांच्या संपन्नतेसाठी ॲग्रोव्हिजन

**पुण्य नगरी** प्रतिनिधी

नागपूर : विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबव्यात, शेतातील उत्पन्न वाढावे आणि शेतकरी संपन्न व्हावा, या उद्देशानेच आपण 'ॲग्रोव्हिजन' या कृषी प्रदर्शनाची सुरुवात केली. आता ॲग्रोव्हिजनचे कायम कार्यालय सुरू करून शेतकऱ्यांना वर्षभर मार्गदर्शन करण्याचा आपला मानस आहे. देशातील कृषी विद्यापीठांनी शेती पद्धतीत बदल करण्यासाठी संशोधन करून शेतकऱ्यांना मदत करावी, असे आवाहन केंद्रीय वाहतूक मंत्री तथा ॲग्रोव्हिजनचे मुख्य प्रवर्तक नितीन गडकरी यांनी केले.

आठव्या ॲग्रोव्हिजनच्या उद्घाटनावेळी गडकरी अध्यक्षस्थानावरून बोलत होते. ॲग्रोव्हिजनचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. गडकरी पुढे म्हणाले,




शेतीच्या धंद्यात कायम नुकसान होत होते. परिणामी, शेतकरी संपूर्णतः खचला होता. त्यामुळे विदर्भात शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमध्ये वाढ झाली होती. त्यांना आता कृषी विद्यापीठांनी मदत करण्याची वेळ आली आहे.त्याचबरोबर राज्यात 'ड्रीप ऐरिगेशन'साठी शेतकऱ्यांना अनुदान मिळण्यास उशीर होतो. त्यासाठी काहीतरी विशेष तरतूद करून ड्रीप घेणाऱ्या शेतकऱ्यांना मदत करावी, असे आवाहन गडकरींनी केले. विदर्भ आणि मराठवाड्यात दुधाचे उत्पादन होते, पण ते कमी आहे. यासाठी येथील पशुधनात वाढ व्हावी व दुग्ध उत्पादन वाढविण्याचे प्रयत्न व्हावे, असे आपले स्वप्न असल्याचे गडकरी म्हणाले.

## मुख्यमंत्री, ऊर्जामंत्री, महापौरांचे कौतुक

राज्यात 'जलयुक्त शिवार'च्या माध्यमातून केलेल्या कामांमुळे भूजलपातळी वाढली आहे. तसेच शेतात पाणी पोहोचविण्यासाठी कृषिपंपांना वीजजोडणी देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि ऊर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केलेल्या कामाचे नितीन गडकरी यांनी भाषणात कौतुक केले. मुख्यमंत्री आणि ऊर्जामंत्र्यांनी पाच हजार कोटी रुपयांची तरतूद केल्यामुळे सुमारे २ लाख ११ हजार ६४८ कृषिपंपांना वीज कनेक्शन मिळाले आहे. याचा फायदा ५० लाख हेक्टर जमिनीला होणार असून याबाबत गडकरी यांनी समाधान व्यक्त केले.

## औषधी वनस्पतींचे उत्पादन वाढवा

रामदेवबाबा यांनी मिहानमध्ये पाच हजार कोटी रुपयांची गुंतवणूक केली आहे. त्यांना लागणारी औषधी वनस्पती भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांमध्ये आढळते. त्याचे उत्पादन वाढवूनही शेतकऱ्यांना नवा रोजगार उपलब्ध होऊ शकतो. तसेच जेवढे मध गोळा करता येईल तेवढे गोळा करून पतंजलीला द्या. त्यांना मोठ्या प्रमाणात मधाची गरज आहे, असे गडकरी म्हणाले. आपल्या आसपासच्या उद्योगांना काय गरज आहे हे ओळखून शेतकऱ्यांनी त्या पिकांचे उत्पादन घ्यावे, असेही ते म्हणाले.

**ॲग्रोव्हिजन** : मध्य भारतातील कृषी प्रदर्शनात कार्यशाळांचे उद्घाटन, रेशीमबाग मैदान, सकाळी १०.३० वाजता.